(21) (3)

D/Pension/GLSI letter


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
## राहुरी- ४१३ ७२२ जि. अहमदनगर

**संकेतस्थळ :-** www.mpkv.mah.nic.in **ई मेल :-** asstt.compt.iv@gmail.com
**दुरध्वनी क्रमांक :-** (०२४२६)२४३२३८


महत्वाचे/ तात्काळ

## परिपत्रक

विषय :- **DCPS** योजनेतील सदस्य अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या दि. ३१.०३.२०१७ रोजीच्या शिल्लक निधीची पडताळणी करणे बाबत . . .

संदर्भ- १. शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५.
२.शासन निर्णय क्र. संकीर्ण-१५१५/प्र.क्र.४४८/२०१५/६-ए, दि.३१.०७.२०१७ व ०६.११.२०१७
३. जा.क्र. मफुकृवि/लेखा-४/एनपीएस/३३२, दि.२१.११.२०१७.
४. जा.क्र. मफुकृवि/लेखा-४/अंनिवेयो/अ.क्र./३३३/२०१७, दि. २३.११.२०१७.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" (DCPS) लागु करण्यात आलेली होती. संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयान्वये सदर योजनेचे "राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS)" मध्ये रुपांतर करण्यात आलेले असुन त्या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी व DCPS/NPS मधील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना या परिपत्रकाद्वारे कळविणेत येते की, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे" वार्षिक विवरणपत्रे संदर्भ क्र.४ अन्वये पाठविण्यात आलेली आहेत. सदर विवरणपत्रे संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ वितरीत करण्यात यावीत.

त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपासुन करण्यात आलेल्या नोंदीमध्ये काही तफावत असेल तर दुरुस्ती करणेसाठी या कार्यालयाच्या दुरध्वनीवर संपर्क करुन व तसे पूर्व नियोजन करुन मुळ विवरणपत्रांच्या (Schedule) स्वांक्षांकित प्रतीसह आपल्या कार्यालयाचा प्रतिनिधी पाठवावा. म्हणजे उचित दुरुस्ती लागलीच करण्यात येईल. दुरुस्ती करतांना सहाय्यक नियंत्रक (४) यांनी सर्वोतोपरी दक्षता घ्यावी व विहीत कार्यवाहीअंती आवश्यक नोंदी ठेवाव्यात.

एकदा "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत" समावेश झाल्यानंतर सदर विवरणांमध्ये कुठल्याहीं प्रकारची दुरुस्ती करता येणार नाही. त्यामुळे सोबत अधिकारी/कर्मचारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांनी संदर्भ क्र. ४ नुसार पाठविलेल्या विवरणपत्रामध्ये सन २०१६-२०१७ चे अखेरपर्यंत कुठलीही त्रुटी नसल्याचे हमीपत्र भरुन दि. १५.०१.२०१८ पुर्वी या कार्यालयाकडे पाठवावे.

नियंत्रक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी

जा.क्र. मफुकृवि/लेखा-४/एनपीएस/ ३६४ /२०१७
दिनांक :- २७/१२/२०१७.

प्रत :- सर्व आहरण व संवितरण अधिकारी, विद्यापीठ कार्यक्षेत्र, मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

D/Pension/GLSI letter

(परिपत्रक क्र. मफुकृवि/लेखा-४/एनपीएस------------ दि.      /१२/२०१७ चे सोबत दयावयाचे हमीपत्र)

## अ. DCPS योजनेमधील सदस्य अधिकारी/ कर्मचारी यांचे हमीपत्र

मी श्री/श्रीमती/----------------------------------------------------- या विद्यापीठामध्ये दि.-------------------------रोजी ---------------------या पदावर नियुक्त झाले/ झालो असुन माझा परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना क्र.---------------------------------------हा आहे. माझ्या नियुक्तीपासुन सन २०१६-१७ अखेरपर्यंतची वार्षिक विवरणपत्रे मला प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार दि. ३१.०३.२०१७ अखेरपर्यंत सदर खाती दरमहा जमा झालेली कर्मचारी हिस्सा व शासन हिस्सा ही रक्कम बरोबर असुन त्यापोटी जमा करण्यात आलेल्या व्याजाची आकारणी देखील बरोबर आहे.

ठिकाण -                                        सही --------------------------------

दिनांक -                                        कर्मचाऱ्याचे नाव ---------------------

                                                हुद्दा --------------------------------

------------------------*******-----------------------

## ब. विद्यमान आहरण व संवितरण अधिकारी यांनी दयावयाचे हमीपत्र

श्री/श्रीमती. ------------------------------------------------- हे/हया या कार्यालयामध्ये दि.-------------------------रोजी ---------------------या पदावर हजर झालेले/झालेल्या असुन ते/त्या या कार्यालयाकडे हजर झालेल्या दिनांक-------------- पासुन त्यांच्या उपरोक्त नमुद खात्यावर जमा करण्यात आलेली कर्मचारी वर्गणी, शासन हिस्सा तसेच त्यावर देण्यात आलेल्या व्याजाची गणना यांची या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या दप्तरावरुन तपासणी केली असता ती बरोबर असल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

कार्यालयाचा शिक्का -                आहरण व संवितरण अधिकारी यांची स्वाक्षरी --------

दिनांक -                             पदनाम ----------------------------------------

                                     कार्यालयाचे नाव -------------------------------